**मार्गदर्शक सुचना**
**<u>कृषि संजिवनी सप्ताह-दि.१ जुलै ते ७ जुलै २०२०</u>**

जा.क्र./कृमावि(विप्र-४)/कृ.स./१४९६४/२०२०
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
दि. २५/०६/२०२०

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक, --------विभाग------**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जि. ---------------**

**विषय - कृषि संजिवनी सप्ताह साजरा करणेबाबत मार्गदर्शक सुचना......**

**संदर्भ -१.**मा.मंत्री,कृषि,माजी सैनिक कल्याण,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र जाक्र./मंत्री/व्हीआयपी/२६४/२०दि.२५/६/२०२०
२. जा.क्र./शेमासे/२०-२१/कृषिदिन/१४७८२/२०२० कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे दि.२२/०६/२०२०

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषि क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी लक्षात घेउन त्यांच्या जयंतीनिमित्त राज्यात दरवर्षी दि १ जुलै रोजी 'कृषि दिन' साजरा करण्यात येतो. कृषि दिन साजरा करण्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.

खरीप हंगाम २०२० यशस्वी करण्यासाठी व आधुनिक कृषि तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी राज्यातील कृषि विभागाचे अधिकारी/ कर्मचारी, कृषि विभाग- जिल्हा परिषद, कृषि विद्यापीठे/ कृषि विज्ञान केंद्रे यांचे शास्त्रज्ञ, आत्मा, पोक्रा, कृषिमित्र यांनी शेतक-यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. कृषि तंत्रज्ञानामधील छोटीशी सुधारणा देखील पीक उत्पादन वाढीवर मोठा परिणाम करु शकते. संदर्भ क्र.१ नुसार मा.मंत्री,कृषि यांनी दि. १ ते ७ जुलै २०२० हा कालावधी "कृषि संजीवनी सप्ताह" साजरा करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व कृषि व कृषि संलग्न विभाग जसे पशुसंवर्धन व दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, महिला आर्थिक विकास महामंडळ, खादी ग्रामोद्योग, सहकार, ग्रामविकास, पणन इत्यादी विभागाच्या सहकार्याने त्यांचेकडील योजनांचे प्रचार प्रसिद्धी करण्यात यावी. यास अनुसरून परिणाम कारक प्रचार व जनजागृती करण्यासाठी दि. १ ते ७ जुलै २०२० या कालावधीत कृषि विभागामार्फत संपुर्ण राज्यात (कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर नियमांचे पालन करुन) "कृषि संजीवनी सप्ताह" साजरा करण्यात यावा. अंमलबजावणीसाठी नाविन्यपूर्ण संकल्पनांचे देखिल स्वागत आहे.

**<u>कार्यपद्धती -</u>**

- सप्ताहापूर्वी स्थानिक वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन इ. माध्यमांद्वारे सदर कार्यक्रमास विस्तृत प्रसिद्धी द्यावी.
- विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधित कृषि विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्र यांच्याशी समन्वय करून १ ते ७ जुलै २०२० या कालावधीत "कृषि संजीवनी सप्ताहाचे नियोजन करावे.
- कृषि विद्यापीठे, केंद्रीय संशोधन संस्था यांनी संशोधीत केलेले अद्ययावत कृषि तंत्रज्ञान व कृषि विषयक इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून त्याचा अवलंब शेतकऱ्यांनी प्रभावीपणे करावयासाठी सप्ताहात मोहिम स्वरुपात आयोजन करण्यात यावे.

➢ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी दररोज किमान एका गावातील, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी दररोज प्रत्येकी किमान दोन गावातील कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन मार्गदर्शन करावे.

**कार्यक्रमाचे सुक्ष्म नियोजन करताना पुढील बाबींचा समावेश करावा :-**

- दि.१ ते ७ जुलै २०२० या कालावधीत गावांमध्ये गावबैठका, शिवार भेटींचे व शेतीशाळांचे आयोजन करावे.
- शेतकऱ्यांसोबत गावात कृषिविषयक राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना भेटी द्याव्यात.
- तालुक्यातील कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच नाविन्यपूर्ण, प्रयोगशील व उल्लेखनीय काम करणा-या शेतकऱ्यांच्या सत्काराचे आणि त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करावे.
- कृषि विषयक मोफत सल्ला व मार्गदर्शनाकरीता एम.किसान पोर्टलवर शेतकरी नोंदणी मोहिम.
- शेतकरी मासिकाचे वर्गणीदार वाढविण्याची मोहिम.
- विविध पीक स्पर्धा आणि पुरस्कारांबाबत प्रचार-प्रसिध्दी.
- जलयुक्त शिवार अभियान, एकात्मीक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, मागेल त्याला शेततळे याबाबतच्या यशोगाथांना प्रसिद्धी.
- आधुनिक तंत्रज्ञानासंबंधी म्हणी व घोषवाक्ये गावागावात ठळक ठिकाणी प्रदर्शित करणे.
- कृषि व कृषि संलग्न योजनांबाबत घडीपत्रिका, हस्तपत्रिका, भित्तीपत्रिका तयार करुन वाटप करणे.
- सप्ताह कालावधीत गावामध्ये शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शनाच्या वेळी विविध सादरीकरणाच्या सि.डी.,डी.व्ही.डी., यशोगाथा पुस्तिका इ.चा वापर करावा.
- कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांनी संपुर्ण सप्ताह कार्यक्रमाचे समन्वयन करावे.

**कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना पुढील विषय/बाबींवर तांत्रिक मार्गदर्शन करावे :-**

- पीक उत्पादनावर परिणाम न करता उत्पादन खर्च कमी करण्याबाबत मार्गदर्शन.
- प्रधानमंत्री पीक विमा योजना, हवामान आधारीत फळ पीक विमा योजना आणि गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेबाबत जनजागृती, प्रसिद्धी व मार्गदर्शन.
- प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेबाबत जनजागृती, प्रसिद्धी व मार्गदर्शन.
- जमीन आरोग्य पत्रिका वितरण, वाचन आणि मार्गदर्शन.
- परंपरागत कृषि विकास योजनेबाबत मार्गदर्शन.
- केंद्र व राज्य शासनाच्या कृषि व कृषि संलग्न विभागांच्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनांबाबत मार्गदर्शन.
- कापसावरील शेंदरी बोंड अळी, मकावरील लष्करी अळी, ऊसामधील हुमणी आणि सोयाबीनवरील मोझॅक व पिवळा मोझॅक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन.
- रुंद सरी वरंबा यंत्र वापराची व पेरणीची प्रात्यक्षिके .
- बिजप्रक्रिया बाबत प्रात्यक्षिके.
- कडधान्य आंतरपिकाबाबत मार्गदर्शन
- बहुपीक पद्धतीचा प्रसार (Crop Diversification).

- एकात्मिक शेती पद्धती संकल्पनेबाबत मार्गदर्शन.
- हायड्रोफोनिक्स- हिरवा चारा निर्मिती
- श्री/चारसुत्री/एस.आर.टी.पध्द्तीने भात लागवडीबाबत मार्गदर्शन.
- बी-बियाणे, खते, औषधे खरेदी व वापर करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन.
- फळबाग लागवड कार्यक्रम.
- मूलस्थानी जलसंधारणाबाबत जनजागृती व मार्गदर्शन.
- आपत्कालीन पीक नियोजनाबाबत मार्गदर्शन.

सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमाचे जिल्हा आणि तालुकास्तरावर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजन करुन सप्ताहात पार पाडलेल्या कार्याचा गावनिहाय आढावा घ्यावा. त्यामध्ये सप्ताहातील कार्यक्रमांबाबत शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया आणि मनोगत घ्यावे. सप्ताहामध्ये झालेल्या कामास व्यापक प्रसिध्दी दयावी.

**<u>सनियंत्रण व पर्यवेक्षण -</u>**

विभागिय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांमार्फत विभागातील सर्व जिल्हयातील कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे. त्यासाठी कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे जिल्हानिहाय कार्यक्रमाची जबाबदारी सोपवावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व प्रकल्प संचालक आत्मा यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांमार्फत तालुकानिहाय कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे. सनियंत्रणासाठी कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे तालुक्यांची विभागणी करुन द्यावी.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांचा जिल्हानिहाय एकत्रित अहवाल **परिशिष्ट-२** मध्येच आयुक्तालयास सादर करावा, सप्ताह कालावधीत विभागातील सर्व जिल्ह्यांचा दैनंदिन जिल्हानिहाय अहवाल आयुक्तालयास कळविणे व सादर करण्याची जबाबदारी कार्यालयातील **अधिक्षक कृषि अधिकारी** यांचेवर सोपवावी.

तसेच सप्ताहात आयोजित कार्यक्रमांचे फोटोग्राफ्स, वृत्तपत्रातील कात्रणे, व्हिडीयो क्लिप्स विभागिय कृषि सहसंचालक यांनी संकलित करुन हार्ड व सॉफ्टकॉपी मध्ये कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

**सदर सप्ताहासाठी स्वतंत्र निधीची तरतूद नाही, तथापि आपल्याकडे आत्माअंतर्गत तसेच विविध योजना/अभियान यामधील प्रशिक्षण, संकिर्ण/आकस्मिक निधी, प्रचार व प्रसिध्दीकरीता असणारी तरतूद यामधुन विहीत मर्यादेच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा.**

सोबत - संदर्भिय पत्र

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत**-माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. सचिव, कृषि, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) कृषि उपसंचालक, मा.आयुक्त,कृषि कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) मा.संशोधन संचालक , सर्व कृषि विद्यापीठे
४) प्रकल्प संचालक, आत्मा (सर्व)
५) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व)
६) कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)

**परिशिष्ट -१**

**कृषि संजीवनी सप्ताहाचा तालुका निहाय नियोजनाचा आराखडा**

**तालुका : ................ ,जिल्हा :..................**

| अ.क्र | दिनांक | गावाचे नाव | कार्यक्रमाचे ठिकाण | वेळ | प्रस्तावित मार्गदर्शक शास्त्रज्ञ/अधिकारी/प्रगतीशील शेतकरी | संपर्क अधिकारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नाव | पदनाम | मो.न. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

**परिशिष्ट -२**

**कृषि संजीवनी सप्ताह - जिल्ह्याचा दैनंदिन अहवाल**

**जिल्हा :.................. विभाग : ................ दिनांक:.............**

| अ क्र | जिल्ह्यातील एकुण गावे संख्या | कार्यक्रम घेतलेली गावे संख्या | उपस्थित शेतकरी संख्या | उपस्थित मार्गदर्शक संख्या | | | उपस्थित लोकप्रतिनिधी / पदाधिकारी संख्या | आयोजित कार्यक्रमाचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्त्रज्ञ | अधिकारी | प्रगतीशील शेतकरी | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी/-

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,

जिल्हा ---------------------